# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. २
## सभावृत्तांत

वेळ :- सकाळी ११.०० वाजता

दिनांक :- ०८/०५/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०८/०५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.नामदेव जनार्दन ढाके
६. मा.सुरेश शिवाजी भोईर
७. मा.अपर्णा निलेश डोके
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
९. मा.निता विलास पाडाळे
१०. मा.उषा दिलीप काळे
११. मा.बिभीषण चौधरी, स्वीकृत सदस्य
१२. मा.विठ्ठल बबन भोईर , स्वीकृत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.एकनाथ पाटील – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.एम.बी.कुलकर्णी, लेखाधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग,मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.अकबर शेख उपअभियंता, विदयुत विभाग, मा.राजेंद्र जावळे उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.के.डी.दरवडे सहा.आरोग्याधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवड अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ९, दिनांक ६/३/२०१८, (कार्यपत्रिका क्रमांक ९, दिनांक ६/३/२०१८ मधील ठराव क्रमांक ३२, विषय क्रमांक ३ सभेत मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि सदर ठरावावर कार्यवाही करतांना स्थापत्य विभागाकडून अभिप्राय घेण्यात यावा.) कार्यपत्रिका क्रमांक १०, दिनांक २६/४/२०१८ तसेच कार्यपत्रिका क्रमांक १, दिनांक २७/४/२०१८ रोजीच्या विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.सन्मा.सदस्य व मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक २ मौजे – बिजलीनगर गुरुव्दार बाजूला जाणा-या भुयारी मार्गाचे काम चालु झालेले असून, सदर भुयारी मार्गास मॉसाहेब जिजाऊ भुयारी मार्ग असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.नामदेव जनार्दन ढाके यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ C.S.R. फंडातुन Sulabh International Social Service Organisation सारख्या संस्थांच्या माध्यमातून दैनंदिन स्वच्छता, देखभाल व दुरुस्तीचे काम देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ३ — विषय क्र. १
दिनांक ०८/०५/२०१८ — विभाग - नगररचना व विकास विभाग
सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर — अनुमोदक: मा.नामदेव जनार्दन ढाके

संदर्भ :- मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ यांचा दिनांक ५/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे-किवळेगांव (कोतवालनगर) येथील स.नं.८०/११/५ मधील गेली ५० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या ३० – ३५ कुटूंबांची काही मंडळींनी फसवणुक करुन आजरोजी सदर नागरीकांना जाणीवपुर्वक लॉण्ड लॉक करुन वापरात असलेल्या रस्त्यावर अनधिकृत बांधकाम करुन त्यांना वेठीस धरले आहे. तरी सदर कुटूंबांना मुख्य रस्त्यापर्यंत जाण्यासाठी ५ मीटर रुंदीचा व ३५ मीटर लांबीचा रस्ता आहे. त्यामुळे सदर जागेवर कलम २०५ अन्वये रस्ता करणेकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता, मा.सुरेश शिवाजी भोईर यांनी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडली.

मौजे – चिंचवड येथील स.नं.२६४/१ पै., सि.स.नं. ११७७ पै. मधील मंजूर विकास योजनेतील २० मीटर रस्ता व गोलाईपासून दक्षिणेकडे १८ मी. रस्तापर्यंत तेथून दक्षिणेकडें पवना नदीपर्यंत इंदिरागांधी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणाने बाधीत परंतु समुचित प्राधिकरणास आवश्यक नसलेले ४५ मीटर रस्त्यास समांतर असलेले परंतु कमी रुंदीचे क्षेत्र हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५ नुसार आरक्षणाऐवजी मनपा रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे. त्यानंतरच बाधीत मिळकतधारकास मोबदला देता येणे मनपास शक्य होणार आहे. सबब सदरच्या इंदिरा गांधी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणातील हिरव्या रंगाने दर्शविलेली आखणीमधील भागास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेकामी प्रस्ताव मा.ब प्रभाग समिती सभेपुढे उपसुचनेव्दारा ठेवणेस व सदर रस्ता घोषीत करणेकामी विहीत कार्यवाही पुर्ण करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४ — विषय क्र. २
दिनांक ०८/०५/२०१८ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ — अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.नामदेव जनार्दन ढाके यांचा दिनांक ८/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे – बिजलीनगर गुरुव्दार बाजूला जाणा-या भुयारी मार्गाचे काम चालु झालेले असून, सदर भुयारी मार्गास मॉसाहेब जिजाऊ भुयारी मार्ग असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५
दिनांक ०८/०५/२०१८
सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील

विषय क्र. ३
विभाग - आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा. अश्विनी गजानन चिंचवडे पाटील यांचा दिनांक ८/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

चिंचवड येथील जिजाऊ पर्यटन केंद्र व महासाधू श्री मोरया गोसावी क्रिडा संकुल येथे बालगोपाळांपासून, अबालवृध्दांची तसेच नागरीक बंधू भगिनींची खुप गर्दी असते त्यामुळे स्वच्छता गृहाचा वापर हा जास्त होतो. तेथील स्वच्छता गृहातील स्वच्छछतेबाबत कायमच तक्रारी असतात. त्यामुळे C.S.R. फंडातुन Sulabh International Social Service Organisation सारख्या संस्थांच्या माध्यमातून दैनंदिन स्वच्छता, देखभाल व दुरुस्तीचे काम देण्यात यावे त्यामुळे दैनंदिन स्वच्छता राहील. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ९३/२०१८.
दिनांक :०८/ ०६ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना